Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 47100)


ISSN 2277-5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX, Issue - I
January - March - 2020
Marathi / Hindi / English

Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com




Ajanta Prakashan

Scanned with CamScanner

# CONTENTS OF MARATHI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | महिलांचा राजकीय सहभाग आणि पंचायतराज व्यवस्था<br>**प्रा. डॉ. रमाकांत तिडके** | १-३ |
| २ | शेतकरी आत्महत्या एक सामाजिक प्रश्न<br>**डॉ. उमाकांत राठोड** | ४-९ |
| ३ | महिला सबलीकरण<br>**डॉ. साळवे प्रकाश रामदास**<br>**डॉ. किशोर सुर्यवंशी** | १०-१३ |
| ४ | पंचायतराज व्यवस्थेतील ५०% महिला आरक्षण : सद्यस्थिती व वास्तव<br>**डॉ. काळे आर. के.** | १४-१६ |
| ५ | ७३ वी घटनादुरुस्ती<br>**डॉ. नागवे ज्ञानदेव** | १७-२० |
| ६ | ७३ वी घटना दुरुस्ती आणि पंचायतराज<br>**डॉ. आर. के. काळे** | २१-२४ |
| ७ | स्थानिक स्वराज्य संस्था आणि ७३ वी संविधान दुरुस्ती<br>**प्रा. डॉ. सुनिल गुलाबराव पिंपळे** | २५-३० |
| ८ | ग्रामीण विकासातील एक समस्या : महिला सबलीकरण<br>**प्रा. डॉ. अंकुशराव अंबादासराव चव्हाण** | ३१-३३ |
| ९ | महिला सबलीकरण आणि महिलांचे प्रशासनातील स्थान व भूमिका<br>**प्रा. डॉ. दिनकर संतुकराव कळंबे** | ३४-३८ |
| १० | पंचायतराज आणि ७३ वी घटनादुरुस्ती : एक अवलोकन<br>**डॉ. सिध्देश्वर सटाले** | ३९-४३ |
| ११ | पंचायतराज व्यवस्थेचा ऐतिहासिक तथा सैध्दांतिक अढावा<br>**प्रा. संदिप शंकर बावस्कर** | ४४-५० |
| १२ | शेतकऱ्यांच्या आत्महत्या - वैचारिक सुसंघटन काळाची गरज<br>**डॉ. बेग रेहानाआरा ईस्माइल** | ५१-५६ |




Scanned with CamScanner

VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# ६. ७३ वी घटना दुरुस्ती आणि पंचायतराज

**डॉ. आर. के. काळे**
विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग, बलभीम महाविद्यालय, बीड.

**प्रस्तावना**

स्थानिक स्वशासन किंवा पंचायतराज व्यवस्था ही लोकशाहीच्या दृष्टीने एक महत्वपूर्ण बाब आहे. स्थानिक स्वशासन संस्था म्हणजे नागरिकांवर लोकशाहीचे संस्कार करणाऱ्या पाठशाळाच आहेत. राज्यसंस्थेच्या कारभारात सामान्य माणासाने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग घेऊन प्रत्येक निर्णय स्वतः घेण्याची जी लोकशाहीची शिस्त आहे ती स्थानिक स्वशासनाच्या प्रयोगातून निर्माण होते. भारतात संस्कृती संरक्षणाचे व संपूर्ण स्वयंशासीत समाज उभा करणचे कार्य पंचायतराज व्यवस्थेनेच निश्चित केले आहे. भारत लोकशाही स्वातंत्र्याची ६२ वर्षे पूर्ण करून यशस्वीरित्या वाटचाल करीत आहे. सद्यास्थितीत भारतीय लोकशाहीसमोर नव-नवीन आव्हाने देखील आहेत. परंतु त्याही संदर्भात भारतातील राजकीय सत्तेच्या विकेंद्रीकरणाची प्रक्रिया गतिमान करून भारतीय पंचायतराज व्यवस्थेचा पाया अधिक मजबुत करण्याच्या दृष्टीने स्थानिक स्वशासन संस्थांनी बहुमोल कामगीरी पार पाडली आहे. लोकनेतृत्वाचे धडे देणाऱ्या या पाठशाळेतून भारतात सबळ राजकीय नेतृत्व निर्माण करण्याची बहुमुल्य कामगीरी या स्थानिक स्वशासन संस्थाकडून होतांना दिसते.

**भारतातील पंचायत राज्याचा उगम**

भारतातील पंचायत राज्याचा विकास स्वातंत्र्यानंतर सुरू झाला. भारत स्वतंत्र झाल्यानंतर संघराज्य स्थापन करण्याचा निर्णय झाला होता त्याचप्रमाणे केंद्र सरकार व अनेक घटक सरकारे अशी सत्तेची विभागणी केली. भारताने लोकशाही स्विकारल्यामुळे सत्ता राबवितांना ग्राम, तालुका, व जिल्हा पातळीवर जनतेला सहभागी करून घेणे आवश्यक होते. त्यामुळे खऱ्या अर्थाने लोकशाही देशामध्ये प्रस्थापित होईल.

१९५७ मध्ये गुजरातचे माजी मुख्यमंत्री बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली गेली. ह्या समितीने त्रिस्तरीय व्यवस्था असावी असे सुचविली. ही त्रिस्तरीय व्यवस्था ग्रामीण स्थानिक शासनाच्या बाबतीत सुचविली तिलाच पंचायत राज म्हणतात. पहिला स्तर जिल्हा परिषद, दुसरा पंचायत समिती व तिसरा स्तर ग्रामपंचायत होय. महाराष्ट्रात १९६२ पासून पंचायत राज व्यवस्था अंमलात आली. पंचायत राज व्यवस्थेचा मूळ हेतू ग्रामीण विकासाला चालना करणे हा होता. म्हणजेच संघ सरकारमध्ये लोकशाहीच्या विकासात सर्व घटक सहभागी करून त्याची अधिक प्रगती होईल. ग्रामीण विभागाचा सर्वांगिण विकास साधने.

भारतातील पंचायत राज संस्थाच्या कार्यात आणि स्वरूपात ७३ व ७४ वी घटना दुरूस्ती केली. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थाचे स्वरूपच बदलून गेले. नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी भारतात लोकशाही विकेंद्रिकरण मानले गेले आहे.



Scanned with CamScanner